ePaper

## शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी; अखेर देशभरातून मान्सूनचा निरोप

वर्ष - 6 । अंक - 192 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।सोमवार।दिनांक 24ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews






# आम्ही विठ्ठलाचे वारकरी...

## पिंपळे सौदागरला दिवाळी पहाट : उन्नती, शत्रुघ्न काटे फाउंडेशनचा पुढाकार



। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्ही विठ्ठलाचे वारकरी, दिन गेले भजनाविना सारे " या गजरात अख्ये पिंपळे सौदागर न्हाऊन निघाले. उन्नती सोशल फाउंडेशन आणि शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन आयोजित " स्वरामृत दिवाळी पहाट " ही आनंद, उत्साह अन् जल्लोष सर्वत्र नावीन्याची चाहूल आणि सजावटीची नवलाई, संपन्नतेचे प्रतीक घेऊन आली.**

पिंपळे सौदागरवासियांच्या उपस्थितीत आपल्या सुरेल आणि जादुई आवाजाने लहान-थोरांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या गायकांच्या स्वरसुरांनी दीपोत्सवाचे आगमन झाले. त्यांच्या गायनात रसिक श्रोते अक्षरक्ष: भारावून गेले. एका पेक्षा एक सरस अशी भक्ती आणि भावगीत सादर करून सारेगमप लिटल चॅम्प्स उपविजेता सुप्रसिद्ध गायक प्रथमेश लघाटे, सुप्रसिद्ध गायक संगीतकार कल्याणजी गायकवाड, सारेगमप महाविजेती सुप्रसिद्ध गायिका कार्तिकी गायकवाड, सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पटवर्धन यांनी रसिकांची प्रत्येक गाण्याला दाद मिळवली. तब्बल सात मिनिटे विठ्ठलाचा गजर सुरू राहिल्याने परिसराला प्रतिपंढरीचे स्वरूप आले होते.

हा कार्यक्रम दिवाळीच्या पहिल्याच दिवशी शनिवारी धनत्रयोदशीला (दि. २२) आणि रविवारी (दि. २३) रोजी पहाटे ५ वाजता गोविंद यशदा चौकातील लिनिअर गार्डनमध्ये सलग दोन दिवस उत्साहात पार पडला.. आयोजक उन्नती सोशल फाऊंडेशन आणि भारतीय जनता पार्टी, चिंचवड विधानसभा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. कुंदाताई भिसे, मा. नगरसेवक शत्रुघ्न उर्फ बापू काटे, उद्योजक संजयशेठ भिसे, हभप पुरुषोत्तम महाराज पायगुडे, शेखर महाराज जांभूळकर, सुप्रसिद्ध मॉडेल अनुक्षा गाडेकर, सामाजिक कार्यकर्त्या शारदाताई मुंडे, पीके इंटरनेशनल स्कूल चे संस्थापक जगन्नाथ काटे ,उद्योजक वसंत काटे, जयनाथ काटे, विजय भिसे,भानुदास काटे, सुरेश कुंजीर, विलास काटे, विकास काटे, शशी काटे ,अतुल पाटील ,शाम कुंजीर, राजेंद्र जयस्वाल व जेष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. गायकवाड, व्हायोलीन वादक अपुर्व गोखले, हार्मोनियम प्रविण कासलीकर, तबला किशोर कोरडे, पखवाज राजेंद्र बघे, बासरी निलेश बुंदे, निवेदक दयानंद घोटकर, पुजा थीगळे यांनी साथ केली.

### यापुढेही सांस्कृतिक कार्यक्रम राबवणार : कुंदाताई भिसे

**आयोजक कुंदाताई भिसे म्हणाल्या, गेल्या अनेक वर्षांपासून उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने पिंपळे सौदागरमध्ये संगीत दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात येत आहे. मागील दोन वर्षांत कोविड परिस्थितीमुळे कार्यक्रम होऊ शकला नाही. यंदा "स्वरामृत दिवाळी पहाट" या कार्यक्रमाचे गेली दोन दिवस आयोजन करण्यात आले. पिंपळे सौदागर परिसरातील सोसायटी वर्गाने या कार्यक्रमास हजेरी लावत शोभा वाढविली. यापुढेही असेच सांकृतिक कार्यक्रम राबविणार आहे.**

### शास्त्रीय संगीत कला टिकली पाहिजे : शत्रुघ्न काटे

**माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे म्हणाले, संगीताची जननी ही शास्त्रीय संगीत असून तिची जपवणूक करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जसे मंदीर, गड किल्ले जोपासले जातात तसे शास्त्रीय संगीत जोपासले जावे. संगीत वेदऋचामधून आलेली भाषा आहे. रागाची बिजे शास्त्रीय संगीतात दडली असून, ही कला टिकविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहावे.**

# पिंपळेगुरवमध्ये जल्लोषात रंगली दिवाळी पहाट

## नागरिकांची प्रचंड गर्दी: तरूणाई आणि महिलांनी धरला ठेका

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार लक्ष्मण जगताप व माजी नगरसेवक शंकर जगताप मित्र परिवार तसेच भाजपचे सर्व माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने पिंपळेगुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील हिरवळीवर रविवारी (दि. २३) दिवाळी पहाट रंगली. बासरी-व्हायोलिन-तबला कलाकारांची जुगलबंदी आणि अवीट गोडीच्या गाण्यांच्या फराळाचा पिंपळेगुरवमधील रसिकांनी भल्या पहाटे आनंद लुटला. अनेक गाण्यांवर तरूणाईने ठेका धरला. त्यामुळे मोठ्यांनाही ताल धरण्याचा मोह आवरला नाही. विशेषतः महिलांमध्ये अधिक नृत्य, गाणी आणि जल्लोषात ही पहाट रंगत गेली.**



दिवाळीतील पहिल्याच दिवाळी पहाटच्या या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी व प्रतिभा प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा अश्विनी जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती राजेंद्र राजापुरे, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप, माजी नगरसेवक सागर आंगोळकर, अंबरनाथ कांबळे, शशिकांत कदम, संतोष कांबळे, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य महेश जगताप, माजी नगरसेविका ममता गायकवाड, उषा मुंढे, शोभा आदियाल, माधवी राजापुरे, वैशाली जवळकर, सामाजिक कार्यकर्ते माऊली जगताप, संजय जगताप, नवनाथ जांभुळकर, सखाराम रेडेकर, गोपी पवार, साई कोंढरे, राहुल जवळकर, शिवाजी निम्हण, शिवाजी कदम, सुरेश तावरे, ज्ञानेश्वर खैरे, देविदास शेलार, भाजपच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्षा उज्वला गावडे, पल्लवी जगताप, उर्मिला देवकर, विजया देवकर, कावेरी जगताप, शोभा जांभुळकर, कमल गोंडाळकर आदी उपस्थित होते.

उद्यानाच्या हिरवळीवर रसिकांची गर्दी, दिव्यांचा लखलखाट, आकाश कंदिलाची सजावट आणि दुसरीकडे सुरेल गीतांनी दिवाळीची पहिली पहाट पिंपळेगुरवकरांच्या ह्दयात घर करून गेली. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक त्यागराज खाडिलकर, संज्योती जगदाळे, स्वप्ना काळे, राजू जाधव यांनी भक्तीगीते, भावगीतांसह अनेक मराठी आणि हिंदीतील सुरेल व मधुर गाणी सादर केली. या गाण्यांच्या सुरांनी पिंपळेगुरवचे रसिक मंत्रमुग्ध झाले. अनेक गाण्यांवर तरूणाई थिरकली. हा जल्लोष पाहून मोठ्यांनाही ताल धरण्याचा मोह आवरला नाही. विशेषत: महिलांनी धरलेल्या जल्लोषपूर्ण ठेक्याने दिवाळी पहाट रंगतदार बनली. नृत्य, गाणी आणि जल्लोषात ही पहाट रंगत गेली.

# लक्ष्मीपूजनानिमित्त खरेदीची लगबग!

## फूल बाजार बहरला; मार्केट यार्डात गर्दीमुळे कोंडी

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लक्ष्मीपूजनानिमित्त रविवारी मंडई परिसरात फुले तसेच पूजा साहित्य खरेदीसाठी गर्दी झाली. प्रथेप्रमाणे पूजनासाठी कीर्द, खतावण्यांची व्यापारी वर्गाकडून खरेदी करण्यात आले. मार्केट यार्डातील फूल बाजारात मोठ्या संख्येने नागरिक आल्याने सकाळी कोंडी झाली होती.**



लक्ष्मीपूजन आणि नरकचतुर्दशी सोमवारी (२४ ऑक्टोबर) आहे. लक्ष्मीपूजनासाठी मंडई परिसरातील हुतात्मा बाबू गेनू चौक परिसरात फुले खरेदीसाठी सकाळपासून गर्दी झाली होती. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक फूल बाजारात खरेदीसाठी गर्दी झाली होती. मंडई परिसरात लाह्या, बत्तासे, उस तसेच लक्ष्मी (केरसुणी) विक्रेत्यांनी तात्पुरत्या स्वरुपात दुकाने थाटली होती. व्यापारी वर्गाकडून लक्ष्मीपूजनानिमित्त कीर्द, खतावण्यांचे पूजन करण्यात येते. प्रथेप्रमाणे बोहरी आळीतील व्यापाऱ्यांकडून कीर्द, खतावण्यांची खरेदी व्यापारी वर्गाकडून खरेदी करण्यात आली. मंडई परिसरात मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी आल्याने या भागातून चालणे देखील अवघड झाले होते. या भागातील वाहतूक विस्कळीत झाली होती.

छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फूल बाजारात लक्ष्मीपूजनानिमित्त पुणे, सातारा, सोलापूर परिसरातून फुलांची आवक झाली. परतीच्या पावसामुळे फुलांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीच्या सुक्या फुलांना दर मिळाले. पावसामुळे फुलांच्या प्रतवारीवर परिणाम झाला असून बाजारात आवक झालेल्या ७० टक्के फुलांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. फुले भिजल्याने डागाळली आहेत. झेंडू, गुलछडी, शेवंती, अष्टर या फुलांना चांगली मागणी राहिली, अशी माहिती फूल बाजारातील व्यापारी सागर भोसले यांनी दिली.

घाऊक बाजारात प्रतवारीवरनुसार एक किलो फुलांचे दर पुढीलप्रमाणे- झेंडू- ३० ते १०० रुपये, गुलछडी, २०० ते ३०० रुपये, अष्टर जुडी- ३० ते ५० रुपये, अष्टर सुट्टा- २०० ते ३०० रुपये, बिजली- १०० ते १५० रुपये, कापरी- २० ते ८० रुपये, शेवंती-६० ते २०० रुपये, जरबेरा- ३० ते ५० रुपये, कार्नेशियन- १२० ते १५० रुपये, शेवंती काडी-१५० ते २५० रुपये, लिलियम (१० काड्या)- ८०० ते १००० रुपये, ऑर्चिड- ४०० ते ५०० रुपये, ग्लाडिओ (१० काड्या)- ८० ते १५० रुपये.

### किरकोळ बाजारात झेंडू 70 ते 100 रुपये

लक्ष्मीपूजनासाठी झेंडुच्या मागणीत वाढ झाली. पावसामुळे झेंडू भिजलेला आहे. चांगल्या प्रतीच्या सुक्या झेंडुचे दर वाढले असून किरकोळ बाजारातील चांगल्या प्रतीच्या झेंडुची ७० ते १०० रुपये किलो दर मिळाला.

### लक्ष्मी रस्त्यावर खरेदीची गर्दी

नरकचतुर्दशीनिमित्त नवीन कपडे खरेदी करण्याची प्रथा आहे. कपडे खरेदीसाठी लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता परिसरात रविवारी खरेदीसाठी गर्दी झाली. गर्दीमुळे या भागातील वाहतूक विस्कळीत झाली.

### क्रिकेट सामना संपल्यानंतर खरेदीसाठी गर्दी

भारत-पाकिस्तान क्रिकेट सामान्यामुळे रविवारी दुपारी खरेदीसाठी गर्दी कमी होती. क्रिकेट सामना संपल्यानंतर सायंकाळी मध्यभागात खरेदीसाठी गर्दी झाली होती.

---

## गरजूंना धान्यसंच न मिळाल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादीचे आंदोलन

।पुणे। महाईन्यूज ।

राज्य सरकारने दिवाळीनिमित्त जाहीर केलेल्या १०० रुपयांत धान्यसंच अद्यापही गरजूंपर्यंत पोहोचला नसल्याच्या निषधार्थ शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून दांडेकर पूल येथे शनिवारी आंदोलन करण्यात आले. दिवाळी सुरू होऊनही अद्याप शिधापत्रिकाधारकांना धान्यसंच मिळालेला नाही. या धान्यसंचावर शिंदे-फडणवीस यांचे छायाचित्र नसल्यामुळे संच वितरित करण्यात आले नाहीत, असा आरोप राष्ट्रवादीकडून या वेळी करण्यात आला.

येत्या दोन दिवसांत सार्वजनिक धान्य वितरण प्रणाली पुन्हा पूर्ववत सुरू न झाल्यास पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखविण्यात येतील, असे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी सांगितले. प्रवक्ते प्रदीप देशमुख, मृणालिनी वाणी, प्रिया गदादे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



---

## दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या

### रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी

।पुणे। महाईन्यूज ।

दिवाळीच्या निमित्ताने खरेदीसाठी शहरभरात खरेदीसाठी होत असलेली गर्दी धनत्रयोदशीच्या दिवशीही कायम होती. त्यामुळे शहरात विविध ठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. सणासुदीचा काळ सुरू झाल्यापासून खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी असल्याचे दिसून येत आहे. शहराच्या मध्यवर्ती भागासह सिंहगड रस्ता, कोथरूड, मार्केट यार्ड आदी भागांमध्ये खरेदीसाठी सातत्याने नागरिकांची गर्दी होत आहे.

विशेषतः गेल्या आठवडाभरात गर्दीमुळे अनेकदा वाहतूक कोंडी झाली. शहराच्या मध्यवर्ती भागात आधीच असलेल्या वाहनांमध्ये खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या वाहनांची भर पडून वाहतूक कोंडी झाली. तुळशीबाग, लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता, टिळक रस्ता या भागात वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले.

शनिवारी धनत्रयोदशीच्या दिवशीही हेच चित्र पाहायला मिळाले. शहरात ठिकठिकाणी खरेदीसाठी गर्दी झाल्याचे दिसून आले. मध्यवर्ती भागातील मंडई, तुळशीबाग परिसरात तर चालताही न येण्याइतकी गर्दी झाली होती. खरेदीसाठी येणारे नागरिक हे गर्दीच्या ठिकाणीही मोटारींमधून येत असल्याने गर्दीमध्ये भर पडत असल्याचे



---

## 'पीएमआरडीए'ने समाविष्ट गावांच्या विकासासाठी महापालिकेला ५०० कोटी द्यावे

। पिंपरी । । महाईन्यूज ।

महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमधील विकासकामे करण्याची जबाबदारी महापालिकेवर आणि गावांमधील बांधकाम शुल्क मात्र पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडी) हा विरोधाभास आहे. पीएमआरडीएकडे असलेले बांधकाम विकसन शुल्काचे ५०० कोटी महापालिकेला मिळाले, तर समाविष्ट गावांचा विकास होण्यास मदत होईल, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. पालकमंत्री पाटील यांनी महापालिकेत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध विषयांवर शनिवारी चर्चा केली. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, 'महापालिकेत समावेश झालेल्या ३४ गावांमध्ये बांधकाम आराखडा मंजूर करण्यासाठी पीएमआरडीएने विकसन शुल्क घेतले. त्याचे ५०० कोटी रुपये निधी पीएमआरडीएकडे आहेत. मात्र, त्यातून पीएमआरडीएने या गावांमध्ये कोणतीही विकासकामे केलेली नाहीत. हा विरोधाभास असून पीएमआरडीएने हा निधी महापालिकेला दिल्यास त्यामध्ये नगरविकास खाते आणखी ५०० कोटी रुपयांची भर घालून समाविष्ट गावात १००० कोटी रुपयांची विकासकामे सुरू होतील. त्यातून या गावांमधील अनेक नागरी प्रश्न मार्गी लागतील. शहरात नवीन उड्डाणपूल, भुयारी मार्ग, रस्त्यांची कामे, नाल्यांचे रुंदीकरण आणि खोलीकरणासह सीमाभिंतींच्या कामासाठी ५० टक्के निधी देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.'दरम्यान, कमी कालावधीत अधिक पाऊस झाल्यास शहरात पाणी साचू नये यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने सुरू करावी आणि येत्या जूनपर्यंत संबंधित सर्व कामे पूर्ण करा. कमी वेळेत अधिक पाऊस झाल्यास रस्त्यावर पाणी साचण्याच्या कारणांचा स्वतंत्र यंत्रणेमार्फत अभ्यास करून उपाययोजना करावी.



# दिवाळीच्या तोंडावर रेशनची 'किट किट'

## राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन : केंद्र, राज्य सरकारचा निषेध

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वाढती महागाई लक्षात घेऊन जनसामान्यांना दिवाळी साजरी करता यावी यासाठी दिवाळी फराळाचे साहित्य रास्त भाव दुकानातून आनंदी कीट देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. साखर,रवा,चणाडाळ आणि पामतेल असा शिधा या योजनेतून फक्त शंभर रुपयात उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे या उपक्रमाला आनंदाचा शिधा असे नाव देण्यात आले आहे. मोठा गाजावाजा करून राज्य सरकारने या योजनेची घोषणा केली. मात्र दिवाळी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली तरी आनंदाचा शिधा सर्व सामान्यांच्या घरात पोहचू शकला नाही. त्यामुळे जनसामान्यांचा शिधा मिळणार कधी आणि त्यांचा फराळ होणार कधी असा प्रश्न पडला आहे.**



यावेळी शहर अध्यक्ष अजित गव्हाणे , महीला अध्यक्ष प्रा .कविता आल्हाट, विभागीय अध्यक्ष वैशाली नागवडे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, नगरसेवक सतीश दरेकर , शमीम पठाण , माया बारणे , कार्याध्यक्ष कविता खराडे, ज्योती तापकीर, संगीता कोकणे, ज्योती गोफणे ,मिरा कदम, संगीता ताम्हाणे , सारिका पवार , सुप्रिया सोलकुरे ,ज्योती निंबाळकर, निलेश डोके, दत्ता जगताप , किरण देशमुख, लाल मोहम्मद चौधरी, विष्णू शेळके, राजेंद्र साळुंखे, माधव पाटील, अकबर रशीद मुल्ला,हरीभाऊ तिकोणे, सावंत, सचिन निंबाळकर आदी उपस्थित होते. विभागीय अध्यक्ष वैशाली नागवडे म्हणाल्या, ऐन दिवाळीच्या काळात गरिबांच्या घरात अंधार पडला पण या सरकारला काही फरक पडेना. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी राज्यात दुष्काळ जाहीर करा म्हणून सांगितले. परंतु, सरकार आपल्याच तंद्रीत आहे जन सामान्यांचे त्यांना काही घेणे देणे नाही असा आरोप राज्य सरकारवर केला.

### गोरगरिबांची दिवाळी चित्रात, फराळ सरकारच्या पात्रात...

**शहर अध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले, महाराष्ट्र हा महागाईने त्रस्त झाला आहे अनेक समस्या या राज्या समोर असताना गरीब जनतेला शंभर रुपयाची आनंदी किट देण्याचा निर्णय घेतला.प्रत्यक्षात फक्त किटचा गाजावाजा केला पण गरिबांपर्यंत किट पोहचले नाही या अयशस्वी सरकारचा निषेध करतो. शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट म्हणाल्या राज्य सरकारने गोरगरीब जनतेला फक्त खोटी आश्वासने दिली आणि चित्रात दिवाळी साजरी करायला सांगितली. गोरगरिबांची दिवाळी चित्रात आणि दिवाळी फराळ सरकारच्या पात्रात असा आरोप त्यांनी केला.**

---

## हिरानानी घुले, चेतन घुले यांनी जपला माणुसकीचा वसा

# दिघी-बोपखेलवासीयांसाठी 'आपुलकीची दिवाळी'

## सुमारे 20 हजार नागरिकांना दिवाळी भेट



**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी गोड व्हावी. यासह दिवाळीत आपुलकी आणि माणुसकी जपावी, असा संदेश देत दिघी आणि बोपखेल परिसरातील नागरिकांना यावर्षीसुद्धा दिवाळी किट भेट दिले. परिसरात या 'आपुलकीच्या दिवाळी भेट' ची चर्चा रंगली आहे.**

माजी उपमहापौर हिरानानी घुले आणि माजी शिक्षण मंडळ सभापती चेतन घुले यांच्या पुढाकाराने गेल्या सात वर्षांपासून दिघी आणि बोपखेल परिसरातील नागरिकांना दिवाळी किट भेट देण्याचा उपक्रम राबवला जातो. यावर्षी सुमारे २० हजार किट वाटप करण्यात आले.

विशेष म्हणजे, हिरानानी घुले आणि चेतन घुले प्रत्येक घरात स्वत: भेट देतात आणि दीपावलीच्या शुभेच्छा देतात. यासह परिसरातील नागरिकांच्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे विचारपूस केली जाते.

दिवाळी किटच्या माध्यमातून पणती, रांगोळी, रांगोळीचे छाप, उंबरा पट्टी यासह गोडधोड असे पॅकेट तयार तयार केले जाते. त्यामुळे नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छांसह अत्यावश्यक वस्तुंची भेट दिली जाते. सर्वसामान्य नागरिकांडून या उपक्रमाचे कौतूक होते आहे.

शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन घुले म्हणाले की, गोरगरिब, कष्टकरी सर्वसामान्य नागरिकांच्या घरात दिवाळी साजरी व्हावी. त्यासाठी खारीचा वाटा म्हणून मदत व्हावी. यासह लोकांच्या सुख-दु:खात सहभागी होता यावे, यासाठी हा उपक्रम घेतला जातो. अबालवृद्धांचा सहभाग असतो. लोकांशी संवाद होतो. दिघी आणि बोपखेलमधील नागरिक म्हणून एक परिवार आहे. परिवारातील सदस्याप्रमाणे काम करायला आवडते. यापुढील काळात हा उपक्रम निरंतर सुरू ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे.

## संपादकीय

# साध्या जगण्याचा सच्चा सूर

***सामान्य माणसाच्या जगण्याची स्पंदने टिपत त्याच्या जगण्यातील स्थित्यंतरे, मानसिक उलाघालीला आपल्या साहित्यातून वाट मोकळी करून देण्याचे काम यावर्षीच्या साहित्यासाठी नोबेल मिळालेल्या आनी एर्नो यांनी केले. त्यांच्या साहित्यप्रवासाविषयी.***

यावर्षीच्या साहित्यासाठीच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेल्या आनी-तेरेज-ब्लँश द्युशांस-एर्नो आर्थिक प्रगती आणि विषमता, नात्यांचे बदलत जाणारे भावनिक स्थान या सर्वांचा आढावा आपल्याच आयुष्याकडे तटस्थपणे पाहतात. त्यांच्या लेखनातील प्रातिनिधिकता सामान्यांशी जुळते. त्याचीच दखल नोबेल देताना घेतली आहे. आनी एर्नोंचा जन्म छोट्या खेड्यात झाला. बालपण नॉर्मंडी प्रांतातल्या इव्होत या छोट्या गावात गेले. त्यांचे आईवडील छोटेसे कॅफे चालवत, वाणीसामानही विकत. परिस्थिती गरिबीचीच. पण आनी यांनी मन लावून अभ्यास केला.साहित्यातील पदवी मिळवली. आधी शिक्षिकेची नोकरी, नंतर राष्ट्रीय दूरशिक्षण केंद्रात काम करू लागल्या. त्यांची पहिली कादंबरी LES ARMOIRES VIDES (लेझार्म्वार व्हिद -मोकळी कपाटे) १९७४मध्ये प्रकाशित झाली. त्यातील दनिज लेझ्यूर ही १८ वर्षांची नायिका गर्भपात कायदेशीर नव्हता त्या काळात तो करवून घेण्यासाठी जे दिव्य करते त्याची कहाणी आहे. त्याखेरीज त्यांनी आणखी दोन कादंबऱ्या लिहिल्या. एक १९७७ मध्ये आणि दुसरी २००२ मध्ये. त्यांनी ललितलेखनापेक्षा आत्मचरित्रपर लिखाणच अधिक केले. मात्र एकाच वेळी ते लेखन प्रातिनिधिकही आहे. त्यांनीच पुढे आपल्या लिखाणाचे वर्णन अ-व्यक्तिगत आत्मचरित्र असे केले. १९८४मध्ये LA PLACE (ला प्लास -जागा : याचे इंग्रजी भाषांतर मॅन्स प्लेस -पुरुषांची जागा या नावाने प्रसिद्ध झाले.) लिहून त्यांनी आई-वडिलांच्या कॅफे-बारमुळे दिसलेले जग दाखवले. या पुस्तकाला रनोदो पुरस्कार मिळाला. त्यांची दखल घेतली जाऊ लागली. आजवर त्यांची एकंदर २० अ-व्यक्तिगत आत्मचरित्रपर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. सर्वसामान्य, गरीब, पुढे शिक्षणाने जीवनमान उंचावलेल्या साध्या फ्रेंच कुटुंबांचे चित्रण त्यांच्या सुरुवातीच्या साहित्यात दिसते. शाळेतही शिक्षिका तिच्या वर्गातील इतर मुलींना त्यांच्या दैनंदिन जीवनाबद्दल बोलायला प्रोत्साहन देत.



## आनंदी सकाळ

# अन् आनंदे तुडवावी पंढरीची वाट...

वारकरी हो आणि पंढरीला जा, असे तुकोबा द्विरुक्तीने म्हणजे आग्रहाने सांगतात. वारकरी हा महाराष्ट्राचा अभिमानाचा विषय. वारकऱ्यांची लक्षणेही तुकोबांनी सांगून ठेवली. खांद्यावर भगवी पताका, गळ्यात तुळशीमाळ, पंढरीची पायी वारी करणे, पंढरपूरला गेल्यावर चंद्रभागेच्या वाळवंटात देहभान विसरून नाचायचे. असे धुंद नाचल्यानंतर चंद्रभागेत स्नान करून मग कटीवर हात ठेवून उभा असलेल्या सावळ्या पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे! भगवी पताका वैराग्याचे प्रतीक. भगवी पताका खांद्यावर घेऊन निघायचे तर आधी ज्ञानोत्तर भक्ति संपादन करावी लागते. त्यासाठी वारकऱ्याने आजीवन एकादशी व्रत नेमाने पाळायचे असते. विवेक जागृत करावा लागतो. मग वैराग्य आपसूक येते. वैराग्याची भगवी पताका खांद्यावर घेतली की, तुळशीमाळ घालायची. विठोबाच्या दर्शनासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवण्याचा निर्धार करावा लागतो. भोगांचा त्याग करायला शिकावे लागते. नंतर पंढरीची वाट पायी तुडवायची असते.परमार्थात नियम थोडाच करावा.

# या कुपोषणाचे काय?






गरिबीमुळे देशात कुपोषण आहे हे खरेच. पण शहरी नागरिकही चुकीच्या संकल्पनांच्या आहारी जाऊन चुकीचा आहार घेत आहेत. त्यातून कुपोषण आणि विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हे कुपोषण कसे थांबणार?

देशात ३३ लाख मुले कुपोषित आहेत. ही मुले आदिवासी, ग्रामीण अथवा गरीब असतात. परंतु सधन वर्गातील केवळ मुलेच नव्हे तर अनेक जण कुपोषित असतात, याचा विचार आपण कधी करतो का? परिस्थितीमुळे झालेले कुपोषण आणि स्वतः ओढवून घेतलेलं कुपोषण असे दोन प्रकार आहेत, त्याकडे आपण दुर्लक्ष करतो त्याचा फटका भविष्यात नक्कीच बसणार आहे. आज जगातल्या औषध कंपन्यांचा नफा आणि वार्षिक वृद्धीचे आलेख पाहिले तर लक्षात येते की, लाखो करोडो रुपये आपण औषधे आणि आरोग्य सेवांवर घालवत आहोत. म्हणजे बऱ्याच जणांनी आपले आरोग्य औषधांवर सोपवले आहे. पण मुळात आपले अन्न जे आपल्याला ऊर्जा देतं, आरोग्य सुस्थितीत ठेवतं आणि शरीराची झीज भरून काढण्यास मदत करतं, त्याविषयी मात्र शहरातील नागरिक तितके जागृत नाहीत.

औद्योगिक प्रक्रिया करून बनवलेल्या अन्नसाखळीत आपण कसे अडकलो हे जाणून घेण्यासाठी थोडा मानवी इतिहास बघूया. २५ लाख वर्षांपूर्वी होमो सेपियन या मानवाच्या प्रजातीच्या वंशजांच्या उत्क्रांतीला सुरुवात झाली. लाखो वर्षे मानव शिकार आणि अन्न गोळा करत राहात होता. त्यावेळी मानव फळे, वनस्पती, मांस, कंद असे अनेक प्रकारचे वैविध्य पूर्ण आणि पोषक अन्न खात होता. बारा हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागला. युवल नोव्हा हेरारी याने सेपियन या पुस्तकात शेतीला मानवी इतिहासातील फसवणूक असं म्हटलं आहे. शेतीमुळे मानवाला स्थिरता आली. त्याच्या आहारातील विविधता कमी झाली. सहज अन्न उपलब्धतेमुळे लोकसंख्या वाढत गेली. शेतीच्या उत्पादनाच्या वाढीपेक्षा खूप मोठ्या पटीने लोकसंख्या वाढली. अन्न सुरक्षिततेसाठी मग शेती उत्पादन वाढवण्यासाठी जगभर संशोधन झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतातही हरित क्रांती झाली. शेतीकडे औद्योगिक दृष्टीने बघत, पोषण दुर्लक्षित करून फक्त एकरी उत्पादन अधिक कसे वाढवता येईल, यावर सरकारे संशोधनातून पैसे खर्च करू लागली आणि आणि योजना आणू लागली. तेव्हापासून शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य, मानवी आरोग्य आणि निसर्ग यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.औद्योगिक शेतीत पारंपारिक वाणाच्या जागी संकरित बीजे आली. नैसर्गिक खत आणि नैसर्गिक पद्धतीने कीटकांचा बंदोबस्त करण्याची प्रक्रिया जाऊन रासायनिक खते, कीटकनाशके आणि ग्लयफोसेटसारखी तणनाशके आली. उत्पादनात वाढ झाली पण पोषण कमी झाले. नफा वाढला पण तो फक्त रासायनिक कंपन्यांचा, अन्न उद्योजकांचा, व्यापारी आणि दलालांचा. रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा कस कमी होत गेला.

# वाढती महागाई, घटते मुद्दल..

**१ एप्रिल २०२० पासून अल्पबचतीच्या विविध योजनांच्या व्याजदरांत ०.७० ते १.४० टक्के कपात करण्यात आली.**

केंद्र सरकारने १ ऑक्टोबरपासून आर्थिक वर्ष २०२२-२३च्या तिसऱ्या तिमाहीसाठी अल्पबचतीच्या पाच योजनांच्या व्याजदरात ०.१० ते ०.३० टक्के इतकी अत्यल्प वाढ केली असून उर्वरित सात अल्पबचत योजनांच्या व्याजदरात कोणतीही वाढ केलेली नाही. ज्येष्ठ नागरिक बचत योजनेच्या व्याजदरात ०.२० टक्क्यांची वाढ होऊन तो ७.६० टक्के, किसान विकास पत्रावरील व्याजदर ६.९० टक्क्यांवरून ७ टक्के, मासिक उत्पन्न योजनेचा व्याजदर ६.६० वरून ६.७० टक्के, तीन वर्षे मुदत ठेवीचा व्याजदर ५.५० टक्क्यांवरून ५.८० टक्के तर दोन वर्षे मुदत ठेवीचा व्याजदर ५.५० टक्क्यांवरून ५.७० करण्यात आला आहे. सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र व सुकन्या समृद्धी योजना आदी उर्वरित सात योजनांच्या व्याजदरांत मात्र कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. गेल्या पावणेचार वर्षांत महागाई प्रचंड वाढली आहे. या पार्श्वभूमीवर व्याजदरांसंदर्भातील हे धोरण कोणत्या आर्थिक निकषांवर आधारित आहे,



हे सरकारने स्पष्ट करणे आवश्यक आहे. सरकारने २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अल्पबचत योजनांच्या व्याजदरात थोडी वाढ केली. परंतु त्यानंतर कोविडकाळात

१ एप्रिल २०२० पासून अल्पबचतीच्या विविध योजनांच्या व्याजदरांत ०.७० ते १.४० टक्के कपात करण्यात आली. ३१ मार्च २०२१ रोजी अल्पबचत योजनांच्या व्याजदरात ०.४० ते १.१० टक्के कपात जाहीर करण्यात आली होती, परंतु पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन 'व्याजदरकपात चुकून जाहीर केल्याचे' सांगून २४ तासांत ती मागे घेण्यात आली.

वाढत्या महागाईमुळे रेपोदरात १.९० टक्के वाढ झाली आहे. बँकांच्या मुदत ठेवींवरील व्याजदरातील वाढीच्या पार्श्वभूमीवर अल्पबचतीच्या योजनांच्या व्याजदरांत मोठी वाढ करणे गरजेचे होते. परंतु तसे न करून सरकारने कोट्यवधी गुंतवणूकदारांवर अन्याय केला आहे. सरकारने २०१६ पासून अल्पबचत योजनांचे व्याजदर बाजारचलित केले. म्हणजे हे दर खुल्या बाजारातील व्याजदराशी निगडित असतात आणि प्रत्येक तिमाहीत समान मुदतीच्या सरकारी रोख्यांच्या व्याजदराशी समानता साधून व त्यामध्ये कमाल एक टक्का मिळवून निश्चित केले जातात. अल्पबचत योजनांवरील व्याजदरांचे तिमाही तत्त्वावर निर्धारण करण्याच्या सरकारच्या सूत्राचा विचार केला तर अल्पबचतीच्या योजनांच्या व्याजदरात मोठी वाढ करणे आवश्यक होते.

२८ सप्टेंबर २०२२ रोजी १० वर्षे मुदतीच्या सरकारी रोख्यांवर ७.३३९ टक्के तर ५ वर्षे मुदतीच्या सरकारी रोख्यांवर ७.३४ टक्के परतावा मिळाला होता. तसेच २९ जून, २०२२ रोजी १० वर्षे मुदतीच्या सरकारी रोख्यांवर ७.४६ टक्के उत्पन्न मिळाले होते.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “आज केवळ घोषणांची अतिवृष्टी, अन् या निर्दयी सरकारकडे भावनांचा दुष्काळ”

## उद्धव ठाकरेंचा शिंदे-फडणवीस सरकारवर हल्लाबोल!

। मुंबई । महाईन्यूज ।



शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आजपासून(रविवार) मराठवाडा दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी औरंगाबादमधील दहेगावात जाऊन शेतीच्या नुकसानीची पाहणी केली व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवादही साधला. तसेच त्यांनी पेंढापूर येथील शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. यानंतर आयोजित पत्रकारपरिषदेत बोलताना त्यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांवर ज्या आपत्ती येतात त्या दोन प्रकारच्या असतात, एक कोरडा दुष्काळ असतो तर एक अतिवृष्टीची आपत्ती असते. हे आपल्या हातात नसतं परंतु ही अस्मानी संकट आल्यानंतर सरकारचं कर्तव्य असतं की शेतकऱ्याला उघड्यावर पडू द्यायचं नाही, त्याचं घरदार उघड्यावर पडता कामानये. परंतु आज एकूणच घोषणांची अतिवृष्टी सुरू आहे आणि अंमलबजावणीच नव्हे तर मी म्हणेण या निर्दयी सरकारकडे भावनांचा दुष्काळ आहे.” असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

पत्रकारपरिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, “आजची माझी भेट ही प्रतिकात्मक आहे. एका विचित्र अवस्थेत आपण सर्वजण आहोत. एकाबाजूला दिवाळी सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचं दिवाळं निघालेलं आहे. दिवळी साजरी तर सोडून द्या पण दिवाळीत कपडे कोणते घालायचे, घरात अन्न काय शिजवायचं? हा मोठा प्रश्न आपल्या अन्नदात्याला पडलेला आहे. मी का मुद्दाम आलो. केवळ आज विरोधी पक्षात आहे म्हणून मी आलेलो नाही. तर या शेतकऱ्यांचं ऋण आपल्यावर आहे, नेहमीच असतं. महाविकास आघाडीच्या काळात साधरण दोन-अडीच वर्ष करोनाने आपली खाल्ली, सर्वत्र लॉकडाउन असताना, आपल्या अर्थव्यवस्थेला जर कोणी आधार दिला असेल तर आपल्या अन्नदात्याने दिला आहे. कृषी क्षेत्राने दिला आहे कारण तिथे लॉकडाउन करता येणं शक्य नव्हतं. जर शेतकरी तेव्हा राबला नसता, तर आपल्या आर्थिक परिस्थितीचं सुद्धा दिवाळं निघालं असतं.”

याशिवाय, “पावसाची सुरुवात ही चक्रीवादळाने होते. त्यानंतर मग संततधार, अतिवृष्टी ढगफुटी होते. मागील आठ-दहा दिवसांपूर्वी पुण्यातही अतोनात पाऊस पडला. रस्ते तुंबले घरात पाणी गेलं. पण आपल्या मुख्यमंत्र्यांनी त्यावर उत्तर दिलं नाही असा भाग नाही. कारण, त्यांच्याकडे सगळ्या प्रश्नांवर उत्तर आहे, तर त्यांनी उत्तर दिलं की पाऊस किती पडावा हे महापालिका ठरवत नाही. त्याचप्रमाणे ते इथल्याबाबतीतही म्हणतील की शेतात आणि ग्रामीण भागात पाऊस किती पडावा हे सरकारच्या हातात नसतं.”

---

# भोसरी भूखंड प्रकरणी फेरचौकशीचे आदेश दिल्यानंतर खडसेंचे गंभीर आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।



भोसरी भूखंड प्रकरणी पुणे न्यायालयाने फेरचौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर एकनाथ खडसे यांनी पत्रकार परिषद घेत आपली बाजू मांडली आहे. आपल्याला राजकीयदृष्ट्या संपवण्यासाठी सत्ताधारी पक्षातील काही मंत्र्यांकडून भोसरी भूखंड प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप केला आहे.

भोसरी भूखंड प्रकरणात यापूर्वीच काहीही तथ्य नसल्याचा अहवाल एसीबीने पुणे जिल्हा सत्र न्यायालयात सादर केला आहे. असं असूनही राज्यातील सत्ताधारी पक्षाने हस्तक्षेप करून पुन्हा चौकशीचा ससेमिरा आपल्या पाठीमागे लावला आहे, अशी प्रतिक्रिया एकनाथ खडसे यांनी दिली आहे. ते मुक्ताईनगर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. संबंधित प्रकरणावर भाष्य करताना एकनाथ खडसे म्हणाले की, भोसरी भूखंड प्रकरणात यापूर्वीही ‘अँटी करप्शन ब्युरो’नं चौकशी केली आहे. या चौकशीनंतर एसीबीनेच संबंधित प्रकरणात काहीही तथ्य नसल्याचा अहवाल पुण्याच्या सत्र न्यायालयात सादर केला. पुण्याच्या न्यायालयात मागील अठरा महिन्यापासून हा अहवाल प्रलंबित आहे. असं असताना आता राज्य सरकारने या प्रकरणात हस्तक्षेप केला असून फेरचौकशीची मागणी केली आहे. राजकीय हेतुने सरकार पुन्हा चौकशीची मागणी करत आहे.

“यावर न्यायालयानेही आश्चर्य व्यक्त केलं आहे. न्यायालयाने म्हटलं की, हे अनोखं प्रकरण वाटत आहे. कारण तुम्हीच चौकशीअंती या प्रकरणात काहीही तथ्य नसल्याचा अहवाल सादर केला. आता पुन्हा नव्याने चौकशी करू इच्छित आहात. या टिप्पणीनंतर न्यायालयाने सरकारी पक्षाचा मागणी मान्य करत, ३१ जानेवारीपर्यंत याबाबतचा अहवाल पुन्हा सादर करण्यास सांगितलं आहे. तोपर्यंत या प्रकरणात कुणालाही अटक करता कामा नये. कारण हा राजकीय षडयंत्राचा भाग वाटतो” असं न्यायालयाने सूचित केल्याची माहिती खडसेंनी दिली.

“काहीही करा आणि खोट्या गुन्ह्यामध्ये नाथाभाऊला अटक करा, असं सत्ताधारी पक्षातील काही मंत्र्यांना वाटत आहे. कारण मला अटक झाल्यानंतर त्यांचं मैदान साफ होणार आहे.

---

# शिंदे-फडणवीस सरकारमधील आमदारांची धुसफूस चव्हाट्यावर

## गुवाहाटीवरून पेटला वाद

। मुंबई । महाईन्यूज ।

शिंदे-फडणवीस सरकारने घेतलेल्या महत्वाच्या निर्णयामुळे सर्व काही सुरळीत सुरु असेल तर वाटलं होतं. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारमध्ये अलबेल असल्याचं दिसून आलं आहे. सरकारमधील आमदारांची धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहेत. गुवाहाटीवरुन झालेल्या आरोपांमुळे आमदार बच्चू कडू आणि रवी राणा यांच्यातील वाद चांगलाच पेटला आहे. बच्चू कडू यांनी आमदार रवी राणांविरुद्ध थेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

गुवाहाटीला जाऊन करोडो रुपये लाटले असा आरोप रवी राणा यांनी बच्चू कडू यांच्यावर केला होता. या आरोपांवरुनच बच्चू कडू यांनी पोलिसांत तक्रार दाखल करत रवी राणा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. रवी राणा यांनी माझी बदनामी केली आहे. 20-20 वर्ष आमची राजकीय करिअर उभं करायला गेली. मी पैसे घेऊन जर गुवाहाटीला गेलो असेल तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच याचे उत्तर दिले पाहिजे, असं बच्चू कडू म्हणाले.



---

# राज्याच्या जीएसटी उत्पन्नात अंदाजापेक्षा अधिक वाढ

। मुंबई । महाईन्यूज ।

कोरोनाच्या जागतिक संकटानंतर अडचणी सापडलेल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेने आता उभारी घेतली असून वस्तू आणि सेवा कराच्या उत्पन्नात अंदाजापेक्षा अधिक वाढ झाली आहे. वित्त विभागाने ऑगस्ट 2022 पर्यंत जीएसटीचे उत्पन्न 72 हजार 145 कोटी रुपये अंदाजित केले होते. मात्र, प्रत्यक्षात जीएसटीतून 72 हजार 881 कोटी रुपये जमा झाले. ही वाढ कोरोनापूर्व स्थितीची



निदर्शक मानली जात आहे.

राज्य सरकारने जीएसटी थकबाकीदार व्यापाऱ्यांसाठी राबवलेली अभय योजना, कोरोना काळात आर्थिक स्थिती सावरण्यासाठी घेतलेले निर्णय आणि कोरोनाचे सावट दूर होऊन पूर्वपदावर आलेले व्यवहार याचा सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेच्या वाढीवर झाल्याने राज्य सरकारला गेल्या तीन महिन्यात कर्जाचा फारसा आधार घ्यावा लागला नसल्याची माहिती वित्त विभागाच्या उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

मार्च 2020 मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव सुरू झाल्यानंतर सरकारने लॉकडाऊन घोषित केला होता. परिणामी राज्याचे अर्थचक्र थांबले होते. मे-जून 2020 दरम्यान कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी आणि दैनंदिन खर्च भागवण्यासाठी सरकारवर ओव्हरड्राफ्ट घेण्याची नामुष्की ओढवली होती. मात्र, गेल्या दोन वर्षात कोरोना निर्बंध टप्प्याटप्प्याने आणि गेल्या एप्रिलपासून पूर्णपणे हटल्याने आर्थिक स्थिती पूर्ववत होऊन राज्याचे उत्पन्न वाढत असल्याचे सूत्रांनी सांगितले. उत्पन्न वाढीतील सातत्य कायम राहिले आणि खर्च नियंत्रणात राहिला तर सन 2022-32 च्या अर्थसंकल्पातील अंदाजित 24 हजार 353 कोटी महसुली तूट कमी होऊ शकते, असा विश्वास सूत्रांनी व्यक्त केला.

# 18 लाख दिव्यांनी उजळली श्रीरामांची अयोध्या नगरी

## मोदींच्या हस्ते दीपप्रज्वलन



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रभू श्री राम यांचे जन्मस्थान असलेल्या अयोध्या नगरीला दिवाळीत मोठ्या प्रमाणावर सजवण्यात आले आहे. शहरात ठिकठिकाणी रामायण आणि रामचरित मानस मधील लोकप्रिय स्तोत्रे आणि दोहे यांचे गायन वाचन केले जात आहे. दिवाळी सणात सहभागी होण्यासाठी अयोध्येच्या बाहेरून लाखो लोक अयोध्येत आले आहेत. यावर्षी अयोध्येत सुमारे 18 लाख मातीचे दिवे प्रज्वलित करण्यात आले.**

दीपोत्सवात दिवे सजवण्यासाठी लोक पहाटेपासूनच राम की पौडी जवळ जमू लागले आणि दरम्यान



राम की पौडी जवळ आलेल्या लोकांची सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांकडून तपस देखील करण्यात आला. लता मंगेशकर चौकाजवळील टॉवरमधील दोन पोलीस राम की पौडी परिसरातील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून होते. हनुमानगढी ते राम की पौडीजवळ जाणाऱ्या रस्त्यावर बॅरीगेटरसुद्धा लावण्यात आले होते. हा भव्य दीपोत्सव अयोध्येतील दिवाळीच्या उत्सवाचा एक भाग म्हणून आज येथे भव्य दीपोत्सव साजरा केला गेला, या दीपोत्सवात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहिले होते. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोदींचे स्वागत आणि सत्कार केला. दरम्यान, योगी आदित्यनाथ यांनी रविवारी सकाळी ट्विट केले की, 'प्रभू श्री राम आणि सीता माता यांचे पवित्र निवासस्थान असलेल्या श्री अयोध्याजीमध्ये आयोजित भारताची अस्मिता आणि सनातन श्रद्धेच्या मूल्यांचे प्राचीन वैभव सातत्याने पुनर्संचयित करणाऱ्या येत आहे. त्याचबरोबर 'या भव्य-दिव्य दीपोत्सव-2022 मध्ये आपले हार्दिक स्वागत आहे'. असंही योगी आदित्यनाथ म्हणाले.

रविवारी संध्याकाळी 'दीपोत्सव' कार्यक्रमात मोदी सहभागी झाले. अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी लाल गालिचा अंथरण्यात आला होता. रामजन्मभूमी मंदिरात राम लल्लाचे दर्शन घेतल्यानंतर पंतप्रधान मोदींनी अयोध्येतील लेझर शो सुद्धा पहिला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पंतप्रधानांना रामजन्मभूमीवर निर्माणाधीन राम मंदिराचे काम दाखविले. पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी संपूर्ण अयोध्येत कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती.

राम की पौडी आणि इतर ३७ घाटांवर सुमारे १५ लाख दिवे प्रज्वलित करण्यात आले होते. दीपोत्सवात या घाटांवर १५ लाख दिव्यांची रोषणाई करून नवा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न अयोध्या प्रशासना कडून करण्यात आला. शहरातील महत्त्वाच्या चौकांवर आणखी तीन लाख दिवे प्रज्वलीत करण्यात आले होते. अयोध्या प्रशासनाने मागील वर्षी दीपोत्सवात ९,४१,५५१ दिवे लावून विश्वविक्रम केला होता. मात्र महाशिवरात्रीला उज्जैनमधील शिप्राच्या काठावर 11,71,78 दिवे लावून हा विक्रम मोडला मोडण्यात आला होता. विशेष म्हणजे शरयू आरतीलाही पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते.

# पेट्रोल पंपाशेजारी असलेल्या फटाक्यांच्या स्टॉलला भीषण आग

## दोघांचा होरपळून मृत्यू

। अमरावती । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आंध्र प्रदेशमधील विजयवाडामध्ये फटाक्यांच्या स्टॉलला भीषण आग लागली आहे. आग लागल्यानंतर फटाक्यांनी पेट घेतल्याने आगीने रौद्र रुप धारण केलं. तसंच, फटाक्यांचा जोरात आवाज येऊ लागला. ही आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू असून दोघांचा होरपळून मृत्यू झाला आहे.

या आगीत फटाक्यांची तीन दुकाने जळून खाक झाली आहे. ग्रीशमन दलाने तत्काळ कार्यवाही केल्याने इतर दुकानांना आगीच्या झळा बसल्या नाहीत. आगीमुळे झालेल्या विस्फोटक आवाजामुळे आजूबाजूला राहणाऱ्या लोकांची झोप उडाली.

आंध्र प्रदेशच्या विजयवाडामध्ये असलेल्या एका मैदानात फटाक्यांचे स्टॉल्स लावले आहेत. तसंच, या मैदानाच्या बाजूला पेट्रोल पंप आहे आहे. सुदैवाने आग पेट्रोलपंपपर्यंत पोहोचली नाही. अग्नीशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी तत्काळ

# आग्रा-लखनऊ महामार्गावर भीषण अपघात

## पाच जणांचा जागीच मृत्यू, 41 जण जखमी

। इटावा । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आग्रा लखनऊ महामार्गावर सैफई पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी पहाटे ३ वाजता मोठा अपघात झाला. स्लीपर बसला मागून भरधाव ट्रकने धडक दिल्याने पाच प्रवासी ठार तर ४१ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघातानंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच आरडाओरडा झाला. स्लीपर बसमधील जखमींना सैफई वैद्यकीय विद्यापीठाच्या आपत्कालीन



रुग्णालयात नेण्यात आले. अपघातानंतर द्रुतगती मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून जखमींवर योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अपघाताची माहिती मिळताच जिल्हा दंडाधिकारी अवनिश कुमार राय, एसएसपी जयप्रकाश एसडीएम ज्योत्स्ना बंधू, मंडळ अधिकारी नागेंद्र चौबे, एसएचओ रमेश सिंह, पीजीआय चौकीचे प्रभारी केके यादव पोलिस दलासह घटनास्थळी पोहोचले.

पोलिसांनी मृतदेह उत्तर प्रदेश युनिव्हर्सिटी ऑफ मेडिकल सायन्सेसच्या शवागारात ठेवले आहेत. सर्व जखमींना उत्तर प्रदेश युनिव्हर्सिटी ऑफ मेडिकल सायन्सेसच्या आपत्कालीन ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी जखमी आणि मृतांच्या नातेवाईकांना माहिती पाठवली आहे.

खासगी स्लीपर बस गोरखपूरहून अजमेरला जात होती. आग्रा लखनऊ एक्स्प्रेस वेच्या चॅनल क्रमांक १०३-१०४ दरम्यान रविवारी सकाळी अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की तीन तासांच्या प्रयत्नानंतर तीन क्रेनच्या मदतीने बस आणि ट्रक वेगळे करण्यात आले आणि त्यात अडकलेल्या जखमींना बाहेर काढता आले.

# केंद्र सरकारचा गांधी कुटुंबाला दणका! राजीव गांधी फाऊंडेशनचा परवाना रद्द

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी राजीव गांधी फाउंडेशन (RGF) या गांधी कुटुंबाशी संबंधित एनजीओचा फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट (FCRA) परवाना केंद्र सरकारने रद्द केला आहे. 2020 मध्ये गृह मंत्रालयाने स्थापन केलेल्या आंतर-मंत्रालयीन समितीने केलेल्या चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे.एका अधिकाऱ्याने सांगितले की, राजीव गांधी फाउंडेशनचा एफसीआरए परवाना चौकशी केल्यानंतर रद्द करण्यात आला आहे. माजी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या आरजीएफच्या अध्यक्षा आहेत, तर इतर विश्वस्तांमध्ये माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, माजी अर्थमंत्री पी चिदंबरम, काँग्रेस



खासदार राहुल गांधी आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वड्रा यांचा समावेश आहे. 1991 मध्ये स्थापन झालेल्या राजीव गांधी फाउंडेशन (RGF) ने 1991 ते 2009 पर्यंत आरोग्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान, महिला आणि मुले, अपंग सहाय्य इत्यादींसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर काम केले आहे. राजीव गांधी फाउंडेशनच्या वेबसाइटनुसार, संस्थेने शिक्षण क्षेत्रातही काम केले आहे. राजीव गांधी फाउंडेशन, राजीव गांधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि इंदिरा गांधी मेमोरियल ट्रस्टला चीनकडून निधी दिल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गृह मंत्रालयाने एक आंतर-मंत्रालयीन समिती स्थापन केली होती. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (PMLA), आयकर कायदा, विदेशी योगदान नियामक कायदा (FCRA) इत्यादींच्या विविध कायदेशीर तरतुदींच्या उल्लंघनाची चौकशी करण्यासाठी मंत्रालयाने ही समिती स्थापन केली होती.

# प्रियांका चोप्राला बालपणीची आठवण

ग्लोबल स्टार प्रियांका चोप्रा ही नेहमीच सोशल मीडियावर सक्रिय राहून अनेक समाजिक विषयांवर भाष्य करत असते. विविध राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय घडामोडींवर ती व्यक्त होत असते. आता पुढील वर्षापासून न्यूयॉर्क शहरातील सरकारी शाळांना दिवाळीनिमित्त सार्वजनिक सुट्टी दिली जाणार आहे, या निर्णयावर प्रियांकाने आनंद व्यक्त केला आहे. सध्या प्रत्येकजण दिवाळी साजरी करण्यात मग्न आहे. या काळात लहान मुलांना उत्साहात सण साजरा करता यावा, यासाठी भारतातील शाळांना किमान दोन आठवडे सार्वजनिक सुट्टी दिली जाते. पण इतर देशात अशा सुट्ट्या दिल्या जात नाहीत. पण पुढील वर्षापासून न्यूयॉर्क शहरातील सरकारी शाळांना दिवाळीनिमित्त सार्वजनिक सुट्टी देण्याचा निर्णय नुकताच जाहीर करण्यात आला. प्रियांका चोप्राचे शालेय शिक्षण अमेरिकेतच झाले असून हा निर्णय जाहीर झाल्यावर तिला तिच्या बालपणाची आठवण झाली आहे.

प्रियांका चोप्राने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओत न्यूयॉर्क शहराच्या महापौर दिवाळीच्या निमित्ताने सरकारी शाळांना पुढील वर्षीपासून दिवाळीची सुट्टी जाहीर करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ शेअर करताना तिने लिहिले, "आज बऱ्याच वर्षांनी क्वीन्समध्ये राहणाऱ्या माझ्यातील किशोरवयीन मुलीच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू आहेत."

प्रियांकाने काही वर्षे अमेरिकेत शालेय शिक्षण घेतले. तेथे काही वर्षे शिक्षण घेतल्यानंतर ती भारतात परतली आणि इथे येऊन तिने बरेलीच्या आर्मी पब्लिक स्कूलमध्ये प्रवेश मिळवला. मनोरंजनसृष्टीत पाऊल टाकल्यावर तिला भरपूर यश मिळाले. बॉलिवूडमध्ये अनेक सुपरहिट चित्रपट दिल्यानंतर ती काही वर्षांपूर्वीपासून हॉलिवूडमध्येही काम करताना दिसते. प्रियांका सध्या पॅट्रिक मॉर्गन दिग्दर्शित साय-फाय ड्रामावर काम करत आहे. त्यासोबतच पुढील वर्षी ती आलिया भट्ट आणि कतरिना कैफ यांच्याबरोबर फरहान अख्तरच्या 'जी ले जरा' या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिकेत



# टाईमपास ३' आता छोट्या पडद्यावर




दिग्दर्शक रवी जाधव यांच्या 'टाईमपास' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. या चित्रपटातील संवादांमुळे हा चित्रपट गाजला होता. आजही प्रेक्षकांना यातील संवाद लक्षात आहेत. टाईमपासच्या यशानंतर दिग्दर्शक रवी जाधव यांनी चित्रपटाचा पुढील भाग प्रेक्षकांसाठी घेऊन आले आणि नुकताच या चित्रपटाचा तिसरा भागदेखील प्रदर्शित झाला होता. तिसऱ्या भागात ऋता दुर्गुळे दिसली होती. 'महाराष्ट्राची क्रश' अशी ओळख असलेल्या ऋताने छोट्या पडद्यावरील अनेक मालिकांमधून प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली. 'टाईमपास ३' चित्रपटात ती एका वेगळ्या भूमिकेत आपल्या समोर आली आहे. या चित्रपटातील गाणी, डायलॉग हे सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत होते. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरदेखील चांगली कमाई केली होती. आता चित्रपट छोट्या पडद्यावर प्रेक्षकांना पाहता येणार आहे. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता झी मराठी वाहिनीवर हा चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटात दगडूच्या भूमिकेत प्रथमेश परब, ऋता दुर्गुळे ही पालवी, माधव लेले उर्फ शाकाल म्हणजेच वैभव मांगले, शांताराम परब म्हणजे भाऊ कदम, आरती वडगबाळकर, दगडू गँग आणि पालवीच्या वडिलांच्या भूमिकेत संजय नार्वेकर बघायला मिळत आहेत. या चित्रपटात एकूण पाच गाणी असून ती क्षितीज पटवर्धन यांनी लिहिली आहेत. तर संगीत अमितराज यांचं आहे. या चित्रपटाची कथा रवी जाधव यांची असून प्रियदर्शन जाधव याने चित्रपटाची पटकथा आणि संवाद लिहिले आहेत. झी स्टुडिओज आणि अथांश कम्युनिकेशनची निर्मिती असलेल्या 'टाइमपास ३' चे दिग्दर्शन रवी जाधव यांनी केले आहे.

# मलायकाला अर्जुन कपूरने दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

अर्जुन कपूर मलायका अरोरा हे सध्या बॉलिवूडमधील चर्चेतील जोडी आहे, लंडन ट्रिप असो किंवा डिनर डेट दोघे एकमेकांबरोबर वेळ घालवताना दिसून येतात. आपापल्या सोशल मीडियावरदेखील ते सक्रिय असतात. नुकतीच अर्जुन कपूरने मलायकाच्या वाढदिवसानिमित्त एक पोस्ट शेअर केली आहे. त्याने दोघांचा फोटो शेअर करत कॅप्शन लिहिला आहे 'वाढदिवसाच्या शुभेच्छा बेबी स्वतःसारखीच रहा, आनंदी राहा माझी रहा', अशा शब्दात त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत'.

मलायका अरोरा ही सध्या चित्रपटांपासून दूर असली तरी तिची सोशल मीडियावर तुफान क्रेझ आहे. मलायकाच्या फॅशनची कायमच चर्चा होत असते. अर्जुन कपूर नुकताच एक 'व्हिलन रिटर्न' चित्रपटात दिसला होता. मलायकाने देखील लॅक्मे फॅशन वीकमध्ये रॅम्प वॉक केला होता. सलमान खानचा भाऊ अरबाज खानबरोबर घटस्फोट घेतल्यावर मलायका आता अर्जुन कपूरला डेट करत आहे. अर्जुन कपूर मलायका एकमेकांना डेट करायला लागल्यापासून हे दोघे लग्न कधी करणार यावरून त्यांचा चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण



झाली आहे. मात्र तिने एका मुलाखतीत सध्या लग्नाचा विचार नाही असे तिने स्पष्ट केले आहे.

# प्राजक्ता माळी मनसेत?

दिवाळीचा उत्साह सर्वत्र पहायला मिळत आहे. राजकीय आणि कलाक्षेत्रामधील मंडळींही दिवाळीच्या शुभेच्छा देत आहेत.बॉलिवूड मंडळींनी तर दिवाळी पार्टीचं खास आजोजन केलं आहे तर राजकीय क्षेत्रातील मंडळीदेखील मागे नाहीत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा शिवाजी पार्क येथील दीपोत्सव तर चर्चेचा विषयच बनला आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनीही त्यांची भेट घेतली. त्यातच मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री प्राजक्ता माळीने देखील राज ठाकरेंच्या घरी जात त्यांची भेट घेतली आहे. या भेटीनंतर नव्या चर्चांना उधाण आले आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळीने दिवाळीबाबत खास पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.या फोटोत ती शिवतिर्थावर गेलेली दिसतेय. तिच्यासोबत अशोक शराफ आणि मराठी चित्रपटसृष्टीतील काही अभिनेत्रीदेखील आहेत. त्याच बरोबर राज ठाकरे,शर्मिला ठाकरे त्यांची सून आणि नातू किआनही आहेत. या फोटोंना कॅप्शन देतांना ती म्हणते, "महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या" शिवाजी पार्क येथील "दीपोत्सवाच्या" निमित्ताने पदरात पडलेले काही खास क्षण दीपोत्सवाच्या आमंत्रणासाठी, अतिशय प्रेमानं केलेल्या पाहूणचारासाठी खूप धन्यवाद. "मा. श्री राजसाहेब ठाकरे" - @RAJ_SHRIKANT_THACKERAY @AMITTHACKERAYSPEAKS अतिशय गोड अशा "शर्मिला ताई" आणि @AMEYAKHOPKAR ... दीपोत्सव बघून इतकी भारावून गेले



की फोटो काढायचे विसरले...त्यामुळे नेमके ते फोटोज् नाहीत..असो पण. किआन बरोबर फोटो काढला...(त्याला भेटायचच होतं...) तिचे हे फोटो आता तुफान व्हायरल होत आहे. तिची राजकीय क्षेत्रातील नेत्यांची घेतलेली भेट हि सहजच नसून त्यामागे तिची काही राजकीय भूमिका आहेत का? असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### कुसल मेंडिस पुन्हा चमकला! लंकेने खाते उघडले



। मुंबई । महाईन्यूज

श्रीलंकेचा सलामीवीर कुसल मेंडिसने पुन्हा एकदा दमदार कामगिरी करत श्रीलंकेच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. श्रीलंकेने सुपर 12 च्या आपल्या पहिल्या सामन्यात धक्का देण्यात तरबेज असलेल्या आयर्लंडचा 9 विकेट्स राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या आयर्लंडने 20 षटकात 8 बाद 128 धावांवर रोखले. आयर्लंडचे हे आव्हान श्रीलंकेने एका फलंदाजाच्या मोबदल्यात 15 षटकातच पार केले. लंकेकडून गोलंदाजीत वानिंदू हसरंगा आणि महीश तिक्षाणा यांनी प्रत्येकी 2 विकेट्स घेतल्या. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आयर्लंडची सुरूवात खराब झाली. दुसऱ्याच षटकात त्यांनी आपला पहिला फलंदाज गमवाला. त्यांनतर सलामीवीर स्टर्लिंगने सावध फलंदाजी करत नवव्या षटकात संघाचे अर्धशतक धावफलकावर लागवले. मात्र 25 चेंडूत 34 धावा करून तो बाद झाला.

# भारताचा विराट विजय; भारतीयांची दिवाळी गोड

## भारताला शेवटच्या चेंडूवर विजयासाठी 1 धावेची गरज असताना अश्विनने चौकार मारत सामना संपवला

अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



भारताने अखेर गेल्या वर्ल्डकपमधील दुबईतील पराभवाचे उट्टे मेलबर्नमध्ये लाखभर प्रेक्षकांच्या साक्षीने काढले. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा 5 विकेट्स राखून पराभव करत वर्ल्डकपची दमदार सुरूवात केली. विराट कोहलीने 53 चेंडूत 83 धावा केल्या.

त्याने हार्दिक पांड्याबरोबर पाचव्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचत गेलेला सामना खेचून आणला. भारताला शेवटच्या चेंडूवर विजयासाठी 1 धावेची गरज असताना अश्विनने चौकार मारत सामना संपवला. तत्पूर्वी, भारतीय संघाने संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. रोहित शर्मांचा हा निर्णय सार्थ ठरवत अर्शदीप सिंगने पहिल्या षटकात पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला भोपळाही फोडू दिला नाही. त्यानंतर दुसऱ्या षटकात शेवटच्या चेंडूवर पाकिस्तानचा स्टार फलंदाज मोहम्मद रिजवानला माघारी धाडले. त्याला हार्दिक पांड्याची देखील साथ मिळाली. अष्टपैलू पांड्याने तीन गडी बाद करत टीम इंडियाला सामन्यात परत आणले. शान मसूद आणि इफ्तिखार अहमद या दोघांनी अर्धशतकी खेळी करत पाकिस्तानच्या धावसंख्येत मोलाचा वाटा उचलला. भारताकडून भुवनेश्वर कुमार आणि मोहम्मद शमीने प्रत्येकी एक गडी बाद केला. शेवटच्या पाच षटकांमध्ये धावगती रोखण्यात भारतीय गोलंदाजांना अजूनही अपयश येत असून या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

# मेलबर्नमध्ये राष्ट्रगीतादरम्यान रोहित शर्मा भावूक

## डोळ्यातून आले अश्रू

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



मेलबर्नमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात टी-20 विश्वचषक सामना खेळला जात आहे. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्यापूर्वी राष्ट्रगीत सुरू असताना टीम इंडियाचे सर्व खेळाडू उत्साहात दिसत होते. त्याचवेळी कर्णधार रोहित भावूक झाला. त्याच्या डोळ्यातून अश्रू आले. रोहित कसेतरी आपल्या भावनांवर आवर घालताना दिसला. हा सामना जिंकून दोन्ही संघांना आपल्या मोहिमेची सुरुवात करायची आहे. भारताने रविचंद्रन अश्विनचा प्लेइंग 11 मध्ये समावेश केला आहे. युझवेंद्र चहल या सामन्यात खेळत नाही. हर्षल पटेललाही संघात ठेवण्यात आलेले नाही. आतापर्यंत खेळलेल्या सामन्याबद्दल बोलायचं झालं तर, पॉवरप्ले संपला आहे. पहिल्या सहा षटकांत पाकिस्तानने दोन गडी गमावून 32 धावा केल्या. अर्शदीप सिंगने भारताला दोन यश मिळवून दिले. त्याने कर्णधार बाबर आझम आणि मोहम्मद रिझवानला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. बाबरला खातेही उघडता आले नाही, तर रिझवानला केवळ चार धावा करता आल्या.

**भारत :** रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, हार्दिक पंड्या, दिनेश कार्तिक (विकेटकीपर), अक्षर पटेल, रविचंद्रन अश्विन, भुवनेश्वर कुमार, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग.

**पाकिस्तान :** बाबर आझम (कर्णधार), मोहम्मद रिझवान (विकेटकीपर), शान मसूद, शादाब खान, मोहम्मद नवाज, हैदर अली, इफ्तिखार अहमद, आसिफ अली, नसीम शाह, हरिस रौफ, शाहीन शाह आफ्रिदी.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही